प्रेस नोट दि.२७/०७/२०१९

---

## खडक पोस्टे तपास पथकाची कामगिरी

## कासेवाडी भवानी पेठेत घरफोडी करणाऱ्या गुन्हेगाराच्या २४ तासात आवळल्या मुसक्या

सदर बाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २३/७/२०१९ रोजी ते दिनांक २४/७/२०१९ रोजी यातील फिर्यादी नामे सिध्देश्वर श्रिधर डांगे वय ४७ वर्षे धंदा. टेम्पोचालक रा.५७६, काशेवाडी, विशाल क्रांती तरुण मंडळाजवळ, भवानी पेठ पुणे व त्यांचे सर्व कुटुंबीय जागरण गोंधळाचे कार्यक्रमासाठी ऊरळी कांचन पुणे येथे राहते घराला कुलुप लावुन गेले असतांना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराचे कुलुप कशातरी सहाय्याने तोडुन लोखंडी कपाटाचे लॉकर मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकुण ७४,८००/- रु किं चा मुद्देमाल घरफोडी करुन चोरी केला, त्याबाबत खडक पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं ३०३/२०१९ भा.दं.वि क ४५७,३८० प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील आरोपीचा खडक तपास पथकातील कर्मचारी हरएक प्रकारे शोध घेत होते, तेव्हा पोकॉ आशिष चव्हाण व पोकॉ महावीर दावणे यांना त्यांचे बातमीदाराने बातमी दिली की, कासेवाडी भवानी पेठ येथील घरफोडी ही रेकॉर्डवरील गुन्हेगार अजय ऊर्फ राजा सुखदेव शिंदे रा.कासेवाडी पुणे याने केली असुन तो राहते घरी आलेला आहे अशी खात्रीशीर माहिती मिळुन आल्याने त्यास राहते घरातुन ताब्यात घेतले, त्याचेकडे दाखल गुन्हयातील चोरीस गेलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कमे बाबत तपास करता त्याने सदरचा मुद्देमाल राहते घरात लपवुन ठेवला असल्याचे सांगितल्याने त्याचेकडुन दाखल गुन्हयात चोरीस गेलेले १) २६,०००/- रु किं एक सोन्याची जोधळ चार पदरी मागे काळे मनी असलेली २) १३,०००/- रु किं एक सोन्याची बोरमाळ ३) २,६००/- रु किं एक सोन्याची नथ ४) ५,४००/- रु किं चे दोन लहान सोन्याचे बदाम ५) ७,८००/- रु किं चे कानातील एक जोड कर्णफुले व २०,०००/- रोख रक्कम असा एकुण ७४,८००/- रु किं चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपीवर यापुर्वी घरफोडीचा गुन्हा दाखल आहे.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री. श्रीकांत तरवडे, अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे, श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री.भरत जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तम चक्रे,पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी श्री.उमाजी राठोड, सहा पोलीस निरीक्षक व पोलीस कर्मचारी विनोद जाधव, गणेश सातपुते, महावीर दावणे, आशिष चव्हाण, राकेश क्षिरसागर, समीर माळवदकर, बंटी कांबळे, प्रमोद नेवसे, रवी लोखंडे, इम्रान नदाफ, योगेश जाधव, विशाल जाधव, हिम्मत होळकर, यांचे पथकाने केली.